**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

Vol - IV Issue-I JANUARY 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

# "जवाहर नवोदय विद्यालयातील नाविन्यपूर्ण उपक्रम आणि शैक्षणिक गुणवत्ता विकास"

**सचिन एकनाथराव नागरगोजे**
पीएच.डी. (संशोधक विद्यार्थी)
शिक्षणशास्त्र संकूल,
स्वा.रा.ती.म.वि. नांदेड.

**डॉ. श्रीमती एस.एस. मुळे**
प्राचार्या,
शासकीय अध्यापक महाविद्यालय , औरंगाबाद

**१.१ प्रस्तावना :**

"शैक्षणिक गुणवत्ता" हा शिक्षणाचा आत्मा समजला जातो मग ते प्राथमिक शिक्षण, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षण असो शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर गुणवत्तेला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. शिक्षण ही एक प्रक्रिया आहे. जी 'गुणवत्ता' ह्या महत्त्वाच्या घटकावर अवलंबून आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून रहावयाचे असेल तर शिक्षण प्रक्रियेमध्ये गुणवत्ता असली पाहिजे मग यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची गरज शिक्षणात आवश्यकता आहे.

तेव्हा भारताच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ च्या शिफारशीच्या अनुसरुन प्रत्येक जिल्ह्यासाठी एक असे संपूर्ण भरतात जवाहर नवोदय विद्यालयाची स्थापना करण्यात आली. तेव्हा प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक आदर्श शैक्षणिक संस्था म्हणून या विद्यालयाकडे पाहिले जाते. तेव्हा या विद्यालयामध्ये शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी काही विशेष असे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून या विद्यालयामार्फत विद्यार्थ्यांचा सर्वांगिन विकास बरोबर शैक्षणिक गुणवत्ता विकास करण्याचा प्रयत्न नवोदय विद्यालयाच्या माध्यमातून केला जातो.

**१.२ शैक्षणिक गुणवत्ता :**

गुणवत्ता म्हणजे एखाद्या आंतरिक असा मूर्त पैलू नव्हे, तर गुण गुणवत्ता ही अत्यंत व्यापक व सर्वसमावेशक अशी संकल्पना आहे.

ज्ञान + कौशल्य + मूल्य = गुणवत्ता

**१.३ UNICEF अहवालानुसार शैक्षणिक गुणवत्तेतील विविध घटक :**

१) पटनोंदणी, उपस्थिती व गळती
२) बौद्धिक विकास
३) भावनिक विकास
४) शिक्षकांचे प्रशिक्षण /सक्षमीकरण
५) लोकसहभाग
६) ई-लर्निंग
७) पालक सहभाग
८) मूल्यमापन व सनियंत्रण
९) अध्ययन अध्यापक प्रक्रिया
१०) विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य व अभिवृत्ती
११) आरोग्यदायी अध्ययनकर्ता

वरील शैक्षणिक गुणवत्तेतील घटकाला अनुसरुन नवोदय विद्यालयामध्ये काही नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी केली जाते.

**१.४ शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी नवोदय विद्यालयातील नाविन्यपूर्ण उपक्रम :**

**१) ई-लर्निंग :**
नवोदय विद्यालयामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी ई-लर्निंग, संगणक तसेच स्मार्ट क्लासरुम इ. चा वापर केला जातो.

**२) पर्यवेक्षित अध्ययन :**
नवोदय विद्यालयामध्ये पर्यवेक्षित अध्ययन (Supervision Study) शिक्षकांच्या पर्यवेक्षणाखाली शाळेच्या व्यतिरिक्त वेळेमध्ये घेतले जाते. हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवला जातो.

**३) स्मार्ट क्लासरुम :**
विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन प्रभावीपणे होण्यासाठी विद्यालयात स्मार्ट क्लासरुम च्या माध्यमातून अध्यापन केले जाते.

**४) चर्चा पद्धत :**
नवोदय विद्यालयामध्ये अभ्यासक्रमा संबंधित चर्चा पद्धतीचा वापर केला जातो.

**५) उपचारात्मक अध्यापन :**
विद्यालयामध्ये दैनंदिन तासिकेच्या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना उपचारात्मक अध्यापन शिक्षकाकडून दिले जाते.

**६) अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर :**
विद्यालयामध्ये शिक्षकाकडून अध्ययन अध्यापनासाठी विविध अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. उदा. संगणक कक्ष, सॅमसंग स्मार्ट क्लासरुम इ.

**१.५ समारोप :**

वरीलप्रमाणे काही नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून नवोदय विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न केले जातात.

**१.६ संदर्भ ग्रंथ सूची :**

१) www.jnv.in
२) शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम
३) जवाहर नवोदय विद्यालय वार्षिक अंक
४) शैक्षणिक गुणवत्ता विकास -म.रा.शै.स. पुणे